जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७२३ दिनांक - २६/०९/२०२३**

खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## किशोर उत्तम गायकवाड (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ३ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

दि.०२/०९/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांचे रहाते घर दापोडी येथुन वाकडेवाडी येथे टु-व्हीलरवर जात असतांना,सहयाद्री हॉस्पीटल समोर,बोपोडी पुणे येथे मित्राचा फोन आल्याने थांबले. त्यावेळी सदर ठिकाणी आरोपी नामे किशोर उत्तम गायकवाड व त्याचे साथिदार यांनी फिर्यादीस "आमचा मित्र आजारी आहे.तो चालु शकत नाही,त्याला उठवण्यासाठी मदत करा" असे म्हणून फिर्यादी मदत करण्यास गेले असता आरोपी नामे १)किशोर उत्तम गायकवाड २)आषिश ऊर्फ बोना संतोष सोजवळ ३)जॉर्ज डॉमनिक डिसुजा ४)अजय सुरेश गाडेकर यांनी फिर्यादीस पाठीमागुन पकडून जबरदस्तीने त्यांच्या पॅन्टीचे खिशातील मोबाईल काढुन घेवुन फिर्यादीस जोरात ढकलून देऊन अंधारात पळुन गेले. सदरबाबत **खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.३३६/२०२३,भादंवि.कलम ३९२,३४** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान आरोपी नामे **१)किशोर उत्तम गायकवाड,वय-१९ वर्ष रा.स.नं.२४,कमलाबाई बहिरट चाळ,बोपोडी, पुणे २)आषिश ऊर्फ बोना संतोष सोजवळ,वय-२४ वर्षे,रा.स.नं.२४,कमलाबाई बहीरट चाळ,सावंत नगरी जवळ,बोपोडी,पुणे ३)जॉर्ज डॉमनिक डिसुजा,वय-१९ वर्षे, रा.स.नं.२४,सम्राट अशोक नगर,पवळे चाळ,पवळे गिरणी समोर,बोपोडी,पुणे यांना अटक करण्यात आली असुन ४)अजय सुरेश गाडेकर,वय-२० वर्षे,रा.बोपोडी,पुणे हा पाहिजे आरोपी आहे.**

नमुद आरोपी १)**किशोर उत्तम गायकवाड (टोळी प्रमुख)** व त्याचे साथिदार यांचेकडुन गुन्हे शाखा,युनिटी-४, पुणे शहर यांनी तपास करुन त्यांचेकडुन पुणे शहर आयुक्तालयातील एकुण १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन,त्यांचेविरुध्द खुन,दुखापत करणे,प्राणघातक हल्ले करणे,खंडणी मागणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी किशोर उत्तम गायकवाड यांने संघटित गुन्हेगारी टोळी तयार केली असुन,त्यांनी बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने संघटीत गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकट्याने किंवा संयुक्तपणे हिसांचाराचा वापर करुन किंवा हिसाचार करण्याची धमकी देवुन किंवा धाकदपटशा दाखवुन किंवा जुलुम जबरदस्ती करुन किंवा अन्य अवैद्य मार्गाने आपले बेकायदेशीर कृत्य चालु ठेवुन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन,त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii) ३(२),३(४) चा अंतर्भाव करणेकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडकी पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र सहाणे यांनी मा.पोलीस उप-आयुक्त परि-४,पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रदेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन खडकी पोलीस स्टेशन येथे गु.नं.३३६/२०२३,भादंवि.कलम ३९२,३४ अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii)३(२),३(४) चा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री. रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-०४,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग,श्रीमती.आरती बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर,श्री.राजेंद्र सहाणे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.मानसिंग पाटील, पोलीस उप-निरीक्षक,मालोजी कांबळे, संतोष भांडवलकर, सर्वेलन्स अंमलदार,राजकिरण पवार, रमेश जाधव, महिला पोलीस अमंलदार,किरण मिरकुटे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर भर देवुन शरिराविरुध्दचे व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्याचे उद्देशाने कठोर पावले उचलण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ६५ वी कारवाई आहे.**